देशाचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर

बाबासाहेबांनी सार्वजनिक क्षेत्रातील औद्योगिकीकरणाचे समर्थन केले.

रिजर्व बँकेची स्थापना, बँका व LIC सारख्या विमा कंपन्या, खाणी व पायाभूत उद्योगांचे राष्ट्रीयीकरण बाबासाहेबांच्या विचारांतूनच झाले.

बाबासाहेब धरणे आणि वीज विभागात वॉटर कमिशनचे अध्यक्ष होते

भारताचा केंद्रीय जल आयोग, केंद्रीय पाणी आणि ऊर्जा संशोधन संस्था यांचे मूळ बाबासाहेबांच्या जलविषयक धोरणात आहे.

देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी दामोदर, हिराकूड अशा मोठ्या जलविद्युत प्रकल्पांमध्ये त्यांचे महत्त्वाचे योगदान होते.



बाबासाहेबांच्या उर्जाधोरणाप्रमाणे 1948 साली ‘केंद्रीय विद्युत प्राधिकरण’ स्थापन झाले आणि पूर्ण देशाला वीज पुरवणाऱ्या ‘राष्ट्रीय विद्युत ग्रिड’चा पाया रचला गेला.

संविधान जागर अभियान

कामगार नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर

रेल्वे कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी 12 व 13 फेब्रुवारी, 1938 रोजी मनमाड येथे

20,000 रेल्वे कामगारांची परिषद भरवली

कामगार मंत्री असताना कामगारांसाठी घेतलेले निर्णय

- महागाई भत्ता
- कामगार संघटनेला मान्यता
- कामाचे तास 8
- अपघातग्रस्त कामगारांस नुकसान भरपाई
- पगारी सुट्टी



> “कामगारवर्गाचे दोन शत्रू आहेत. एक ब्राह्मणशाही व दुसरा भांडवलशाही. ब्राह्मणशाही म्हणजे ब्राह्मण वर्ग नव्हे, तर समता, ऐक्य, बंधुता नाकारणारे लोक. भांडवलशाही म्हणजे जो नफ्याच्या मागे लागून कामगारांचे रक्त शोषून घेतो.
> या शत्रूंची पाळेमुळे कामगारांनी खोडून काढली पाहिजेत.”

संविधान जागर अभियान

बहुजन नायक डॉ. बाबासाहेब आंबेडकर

मूकनायक

मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता

यांसारख्या वृत्तपत्रांद्वारे जनजागृती

> “चवदार तळ्याचे पाणी प्याल्याने
> तुम्ही आम्ही अमर होणार नाही.
> इतरांप्रमाणे आम्हीही माणसे आहोत
> हे सिद्ध करण्याकरिताच त्या
> तळ्यावर आपणास जायचे आहे.”

चवदार तळे सत्याग्रह

**शतकानुशतके भेदभाव व शोषणाचे बळी ठरलेले
एससी, एसटी, ओबीसी, एनटी आणि सर्व महिला यांसाठी
संविधानात आरक्षणाची तरतूद केली.**

**अस्पृश्यता कायद्याने
गुन्हा ठरवला.**

**धर्म, जात, लिंग,
वर्ण, प्रांत यावरून
होणाऱ्या भेदभावाला
बेकादेशीर ठरवले.**



**बाबासाहेबांच्या
अथक प्रयत्नांतून
पहिल्या मागासवर्गीय
आयोगाची स्थापना
झाली.**

सर्व शोषित घटकांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी समता सैनिक दलाची स्थापना केली.

मनुस्मृतीमध्ये अस्पृश्य, शूद्र आणि स्त्रियांना गुलाम करणारे कायदे आणि
श्लोक असल्यामुळे बाबासाहेबांनी मनुस्मृतीचे दहन केले.

संविधान जागर अभियान

शेतकऱ्यांसाठी लढणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर

खोतीप्रथेविरोधात 10 जानेवारी 1938 रोजी स्वतंत्र मजूर पक्षाने डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली 20 हजार शेतकऱ्यांचा मोर्चा विधानमंडळावर नेला

बाबासाहेबांमुळे खोती प्रथा कायद्याने बंद झाली

स्वतंत्र भारताच्या पहिल्या सरकारने **जमीनदारी नष्ट केली आणि मोठ्या प्रमाणावर शेतजमिनीचे वाटप केले, कसेल त्याची जमीन केली.**

बाबासाहेबांमुळे कुळ कायदा अस्तित्वात आला

बाबासाहेबांच्या विचारामुळेच शेतकऱ्यांना बी-बियाणे, खते, कर्ज, कृषी उत्पन्न बाजार समित्या यांची सोय झाली.

फर्टीलायझर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया सारखे सार्वजनिक क्षेत्रातील खत कारखाने उभारले गेले.

संविधान जागर अभियान

महिलामुक्तीसाठी झटणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर

“महिलांची प्रगती झाल्याशिवाय देशाची प्रगती होऊ शकत नाही”



महिलांना वारशाने संपत्तीचा अधिकार, घटस्फोटाचा, पोटगीचा आणि विधवा पुनर्विवाहाचा अधिकार

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ‘स्त्री-सक्षमीकरणाच्या’ विचारातूनच मिळाला!



कामगार मंत्री असताना बाबासाहेबांनी महिला कामगारांसाठी केलेले कायदे

- रात्री काम करण्यास बंदी
- प्रसूती काळात भर पगारी सुट्टी
- पुरुषांप्रमाणे वेतन
- कामाच्या ठिकाणी पाळणाघरे

“रोटीबंदी, लोटीबंदी व भेटीबंदी ह्या साऱ्या बंद्या एका बेटीबंदीमुळे उद्भवल्या आहेत.

ती उठली की, बाकीच्यांना उठविण्याचा प्रयत्न करावयास नको, त्या आपोआप उठतातच.”

संविधान जागर अभियान

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक कार्य

“शिक्षण हा प्रत्येक व्यक्तीचा जन्मसिद्ध हक्क आहे आणि हा अधिकार कुणालाही नाकारता येणार नाही.”

“सरकारने शिक्षण मोफत व सक्तीचे करणे गरजेचे आहे”

बाबासाहेबांच्या या भूमिकेमुळे 14 वर्षांखालील सर्वांना मोफत शिक्षणाची तरतूद केली गेली.

बहिष्कृत हितकारिणी सभा आणि ‘पीपल्स एज्युकेशन सोसायटी’ची स्थापना बाबासाहेबांनी केली. आज या संस्थेची 30 पेक्षा जास्त महाविद्यालये आहेत.

SIDDHARTH COLLEGE OF COMMERCE & ECONOMICS

“विद्यार्थ्यांनी चाळीचाळीत जाऊन जनतेचे अज्ञान दूर केले पाहिजे... **ज्ञानाचा उपयोग आपण आपल्या बांधवांची सुधारणा, प्रगती करण्याकरिता केला पाहिजे; तरच भारत उन्नतावस्थेला जाईल.”**

भारतीय संविधानाचे शिल्पकार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष होते आणि संविधानाच्या मसुद्याच्या निर्मितीत प्रमुख भूमिका बजावली.



बाबासाहेबांच्या आग्रहामुळे संविधानामध्ये मार्गदर्शक तत्वांचा समावेश:

या देशाचे **सरकार हे धर्मनिरपेक्षच असावे.** सरकार सर्व धर्मांना समान व न्याय्य वागणूक देईल.

गरीब-श्रीमंतांमधील दरी कमी करणे सरकारची जबाबदारी आहे.

लोकांना **चांगले शिक्षण, आरोग्य, पोषण, रोजगाराच्या संधी** देण्यासाठी पैसे नाहीत, असे कारण कोणत्याही सरकारने देऊ नये.

“सामाजिक चेतना हीच आपल्या अधिकारांची एकमेव हमी आहे.”

अशी त्यांची ठाम भूमिका होती, त्यामुळेच त्यांनी ही आवाहन केले:

शिका, संघटित व्हा, संघर्ष करा!

संविधान जागर अभियान